२३५६

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ४३४/६९२

ग्रंथ नाम ज्ञानेश्वरी =

विषय

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(1)

२३२१वे ९६२

॥श्रीमद्[illegible]ता॥सावदवी॥

[illegible]याय॥ ॥

॥१॥

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(२)

श्रीगणेशायनमः॥ श्रीसरस्वत्यैनमः॥ श्रीगुरुभ्योनमः॥ श्रीसच्चिदानंदरूपेण॥ वासुदेव
सुतंदेवंकंसचाणूरमर्दनं॥ देवकीपरमानंदंकृष्णंवंदेजगद्गुरुं॥१॥ पार्थायप्रतिबोधितांभग
वतानारायणेनस्वयंव्यासेनग्रथितांपुराणमुनिनामध्येमहाभारते॥ अद्वैतामृतवर्षिणींभग
वतीमष्टादशाध्यायिनीमंबत्वामनुसंदधामिभगवद्गीतेभवद्वेषिणीं॥२॥ ॐनमोजी आद्या॥
वेदप्रतिपाद्या॥ जयजयस्वसंवेद्या॥ आत्मरूपा॥१॥ देवातूंचिगणेशु॥ सकळार्थप्रकाशु॥ म्हणेनिवृत्तिदा
स॥ अवधारिजोजी॥२॥ हे शब्दब्रह्मअशेष॥ तेचिमूर्तिसुवेष॥ तेथेंवर्णवपुनिर्दोष॥ मिरवतअसे॥३॥
स्मृतितेचिअवयव॥ देखाअंगीकभाव॥ तेथेंलावण्याचीठेव॥ अर्थशोभा॥४॥ अष्टादशपुराणें॥
तेचिमणिभूषणें॥ पदपद्धतीखेवणें॥ प्रमेयरत्नांचीं॥५॥ पदबंधनागर॥ तेंचिरंगाथिलें
अंबर॥ जेथेंसाहित्यवाणेंसुरेख॥ उजाळाचें॥६॥ देखाकाव्यनाटका॥ जेंनिर्धारितांसकौतुका॥
त्याचिरुणझुणतिक्षुद्रघंटिका॥ अर्थध्वनी॥७॥ नानाप्रमेयांचीपरी॥ निपुणपणेंपाहतांकु
सरी॥ दिसतीउचितपदेंमाझारी॥ रत्नेंभलीं॥८॥ तेथेंव्यासादिकांचीमती॥ मेखळेचेलां

A project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(3)

मिरवती चोखडेपणें झळकती पलुवसडका ॥ ९ देखा षड्दर्शनें म्हणिपती
तेचि भुजांचीं आकृती म्हणोनि विसंवादें धरिती आयुधें हातीं ॥ १० तरि तर्कु तोचि फर
शु नीतिभेदु अंकुशु वेदांतु तो महारसु मोदकु मिरवे एकें हातीं दंतु जो स्वभावता
खंडितु तो बौद्धमतें संकेतु वार्तिकांचा ॥ १२ मग सहजें तर्कु सत्कारवादु तो पद्मक
रवरदु धर्मप्रतिष्ठा तो सिद्ध अभयहस्त ॥ १३ देखा विवेकवंतु सुविमळ तो
शुंडादंड सरळ तेथें परमानंद केवळ महासुखाचा ॥ १४ तरि संवाद तो
दशन जो समता शुभ्रवर्ण देवो उन्मेषसूक्ष्मेक्षण विघ्नराज ॥ १५
मज अवगमलिया दोनी मीमांसा श्रवणस्थानीं बोधमदामृत मुनी अ
लि सेविती ॥ १६ प्रमेयप्रवाळ सुप्रभ द्वैताद्वैत तेचि निकुंभ सरिसे एकवट तइ
भ मस्तकावरि ॥ १७ उपरि दशोपनिषदें जियें उदारें ज्ञानमकरंदें तियें कु
सुमें मुगुटीं सुगंधें शोभती भलीं ॥ १८ अकार चरणयुगुळ उकार उदर वि

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan

(५)

ॐ१

॥गीताटी० ञाल॥मकार महामंडळ मस्तकाकारें॥१९॥हे तिन्हीं येकवटले॥तेथें शब्दब्रह्म कवळ ॥अध्या०
॥२॥ लें॥तें मियां गुरुकृपा नमिलें॥आदिबीज॥२०॥आतां अभिनव वाग्विलासिनी॥जे चातुर्या ॥१॥
र्थ कळा कामिनी॥ते शारदा विश्वमोहिनी॥नमस्कारिली मियां॥२१॥मज हृदयीं श्रीगु
रु॥जेणें तारिलों महां संसारपुरु॥म्हणोनि विशेष अत्यादरु॥विवेकावरि॥२२॥
जैसें डोळ्यां अंजन भेटे॥ते वेळीं दृष्टीसि फाटा फुटे॥मग वास पाहिजे तेथें प्रकटे॥
महानिधी॥२३॥कां चिंतामणी जालिया हातीं॥सदा विजयवृत्ति मनोरथीं॥तैसा मीं
पूर्णकाम निवृत्ति॥ज्ञानदेव म्हणे॥२४॥म्हणोनि जाणितेनो गुरु भजिजे॥तेणें कृतका
र्य होयिजे॥जैसें मूळसिंचनीं सहजें॥शाखापल्लव संतोषती॥२५॥कां तीर्थें जियें त्रिभु
वनीं॥तियें घडती समुद्रावगाहनीं॥नातरि अमृतरसास्वादनीं॥रस सकळ॥२६॥
तैसा पुढतपुढती तोचि॥मियां अभिवंदिला श्रीगुरुचि॥अभिलाषित मनोरुचि॥
पुरविता जो॥२७॥आतां॰ अवधारा दीकथा गहन॥जें सकळां कौतुकां जन्मस्थान॥ ॥२॥

२

(5)

कें भनि नवरसद्यान । दिनेकत रूचे ॥ २८ ॥ नातरी सर्व सुखाची आदी । जे प्रमेय महानि
धी । नाना नवरससुधाब्धी । परिपूर्ण हे ॥ २९ ॥ हें परमधाम प्रकट । हें विद्यांचें मूळपीठ ॥
शास्त्रजातां विशिष्ट । अशेषांचा ॥ ३० ॥ नातरी सकळ धर्मांचें माहियेर । सज्जनांचें जिव्हार । ठ २
लावण्यरत्नभांडार । शारदेचें ॥ ३१ ॥ नाना कथारूपें भारथी । प्रकटली असे त्रिजगती ॥
अविष्कारोनि महामती । व्यासादिकाचिये ॥ ३२ ॥ म्हणोनि हा काव्यारावो । ग्रंथगरुवतीचा
थे ठावो । येथूनि रसां जाला आवो । रसाळपणाचा ॥ ३३ ॥ तेविचि आयिका आणीक येक ।
येथूनि शब्दश्री सवंशास्त्रिक । आणि महाबोधीं कोवळिक दुणावली ॥ ३४ ॥ येथूनि चातु
र्य शहाणें जालें । प्रमेय रुचीसि आलें । आणि सौभाग्य पोखलें सुखाचें येथें ॥ ३५ ॥ मा
धुर्यीं मधुरता । शृंगारीं सुरेखता । आणि रूढपण उचिता दिसे भलें ॥ ३६ ॥ तेथें कळा
विदपणें कळा । पुण्यासि प्रताप आगळा । म्हणोनि जनमेजयाचे अवलिळा । दोष ह
रले ॥ ३७ ॥ आणि पाहतां नावेक । रंगीं सुरंगतेचि आगळिक । गुणांसि सगुणप णाचें

(८)

॥गीता॥ बिंबें नकुवसयेथें ३८ ना भानुचेनितेजें धवळलें जैसें त्रैलोक्यदिसे उजळलें तैसें व्यासमतिक

॥३॥ वळलें मिरवेविश्व ३९ कां सुक्षेत्रीं बीज घातलें तें आपुलियापरि विस्तारलें तैसें भारथीं सुरवाड ॥अध्या॥ ॥१॥

लें ॥ अर्थजात ४० नातरी नगरांतरीं वसिजे तरि नागरचि होयिजे तैसें व्यासोक्तितेजें धवळित

विश्व ४१ किं प्रथमवयसाकाळीं लावण्याची नव्हाळी प्रकटे जैसी आगळी अंगनाआंगीं ४२

नातरि उद्यानीं माधवी घडे तें वनश्रियेसि वाणि उघडे आधिलापासूनि अपाडें जियापरि ४३

नाना घनीभूत सुवर्ण जैसें न्याहाळितां साधारण मग अळंकारीं बरवेपण निवाडु दावी ४४

तैसें व्यासोक्ति अळंकारलें आवडी बरवेपण पातलें तें जाणोनि काय आश्रायिलें इतिहासीं ४५

नाना पुरतेपणें प्रतिष्ठेलागीं सानीव धरूनि आंगीं पुराणें आख्यानरूपें जगीं भारथासि आलीं

४६ म्हणोनि महाभारथीं जें नाहीं तें नसे लोकीं तिहीं येणें कारणें म्हणिपे पाहीं व्यासोछिष्ठ

जगत्रय ४७ ऐसी सुरस जगीं कथा जे जन्मभूमि परमार्था मुनि सांगे नृपनाथा ॥ जनमेज

या ४८ हे अद्वितीय उत्तम अतिपवित्रैक निरोपम परम मंगळधाम अवधारिजो ४९ ॥३॥

आतां भारथकमळपराग जो हा गीताख्यप्रसंग जो संवादला श्रीरंग अर्जुनेंसीं ५० ॥

३

Joint property of Rajwade Sanshodhan Mandal Dhule and Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai

(७)

नातरी शब्दब्रह्माब्धी ॥ मथिलें व्यासबुद्धि ॥ निवडिलें निरवधी ॥ नवनीत हें ॥ ५१ ॥ मग ज्ञानाग्निसंपर्कें ॥
कढविलें विवेकें ॥ पद आलें परिपाकें ॥ आमोदेंसीं ॥ ५२ ॥ जें अपेक्षिजे विरक्तीं ॥ सदा अनुभविजे
संतीं ॥ सोहंभावें पारंगतीं ॥ रमिजे जेथ ॥ ५३ ॥ जें आकर्णिजे भक्तीं ॥ जें आदिवंद्य त्रिजगतीं ॥ तें भी
ष्मपर्वीं संगती ॥ सांगिजैल ॥ ५४ ॥ जे भगवद्गीता म्हणिजे ॥ जे ब्रह्मेशानीं प्रशंसिजे ॥ जे सनकादिकीं
सेविजे ॥ आदरेंसीं ॥ ५५ ॥ जैसे शारदियेचे चंद्रकळे ॥ माजि अमृतकण कोवळे ॥ ते वेंचिती मनें मवा
ळें ॥ चकोरतलगें ॥ ५६ ॥ तियापरी श्रोतां ॥ अनुभवावी हे कथा ॥ अति हळुवारपणें चित्ता ॥ आणुनियां ॥
५७ ॥ हे शब्देंविण संवादिजे ॥ इंद्रियां नेणतां भोगिजे ॥ बोलाआधीं झोंबिजे ॥ प्रमेयासी ॥ ५८ ॥ जैसे
भ्रमर पराग नेती ॥ परि कमळदळें नेणती ॥ तैसी परि आहे सेविती ॥ ग्रंथीं इये ॥ ५९ ॥ कां आपु
ला ठाव न सांडितां ॥ आलिंगिजे चंद्र प्रकटतां ॥ हा अनुरागु भोगितां ॥ कुमुदिनी जाणे ॥ ६० ॥ ऐसे
नि गंभीरपणें ॥ स्थिरावलेनि अंतःकरणें ॥ आथिला तोचि जाणे ॥ मानेल इये ॥ ६१ ॥ अहो अर्जु
नाचिये पांती ॥ जे परिसणियां योग्य होती ॥ तिहीं कृपा करूनि संतीं ॥ अवधान द्यावें ॥ ६२ ॥

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

भानुतेजें ६

॥गीताज्ञा० ॥४॥

हें सलगी म्यां म्हणितलें ॥ चरणां लागोनि विनविलें ॥ प्रभु सखोल हृदय आपुलें ॥ म्हणोनियां ॥ ६३ ॥
जैसा स्वभाव मायबापांचा ॥ अपत्य बोले जरी बोबडिया वाचा ॥ तरी अधिकाधिक तयांचा सं
तोष वि आंथी ॥ ६४ ॥ तैसा तुम्हीं मी अंगिकारिला ॥ सज्जनीं आपुला म्हणितला ॥ तरि उणें सह
जें उपसाहिला ॥ मां प्रार्थुं कायी ॥ ६५ ॥ परि अपराध तो आणिक आहे ॥ जें मीं गीतार्थ आकळुं
पाहे ॥ तें अवधाराविनउं लाहें ॥ म्हणोनि जी ॥ ६६ ॥ हें अनावर विचारितां ॥ परि वांयां चि धिवंसा
उपजला चित्ता ॥ येरुवीं कायें रव द्योतां ॥ शोभा आंथी ॥ ६७ ॥ कां टिटिभी चांचूवे न्हीं ॥ माप सुयें
सागरीं ॥ मीं नेणतु तियापरी ॥ प्रवर्तलों येथें ॥ ६८ ॥ ऐका आकाश गवसावें ॥ तरि तयाहुनि आ
पणचि थोर होवावें ॥ म्हणोनि अपाड हें आघवें ॥ निर्धारितां ॥ ६९ ॥ यया गीतार्थाची थोरी ॥
स्वयें शंभु विवरी ॥ तेथें भवानी प्रश्न करी ॥ चमत्कारुनी ॥ ७० ॥ तेथें हरु म्हणे जें नेणिजे ॥ दे
वी जैसें कां स्वरूप तुझें ॥ तैसें हें नित्य नूतन देखिजे ॥ गीतातत्त्व हें ॥ ७१ ॥ हा वेदार्थसागर ॥ जया
निद्रिताचा घोर ॥ तो स्वयें सर्वेश्वर ॥ अनुवादला ॥ ७२ ॥ ऐसें जें अगाध ॥ जेथें वेडावती वेद ॥ ॥४॥
तेथें अल्प मीं मतिमंद ॥ काय होये ॥ ७३ ॥ हें अपार कैसेनि कवळावें ॥ महातेज कवणें धवळावें ॥

२प्रत्यक्ष

॥अध्या० ॥१॥

गगन मुठीं सुवावें ॥ मशकें कवि ॥ ७४ ॥ परि येथें येक असे आधारु ॥ तेणें चि बळें भी
सधरु ॥ जें सानकुळ श्रीगुरु ॥ ज्ञानदेव म्हणे ॥ ७५ ॥ येर्‍हवीं तरी मी मूर्ख ॥ जरी जाला
अविवेक ॥ तरी संत कृपादीपक ॥ सोज्वळ असे ॥ ७६ ॥ लोहाचें कनक होय ॥ हें सामर्थ्य प
रिसीं चि आहे ॥ कां म्रत हि जिवित लाहे ॥ अम्रतसिद्धि ॥ ७७ ॥ जरि प्रकटे सिद्ध सरस्व
ती ॥ तरि मुकया बांथी भारती ॥ येथें वस्तु सामर्थ्य शक्ति ॥ नवल कायी ॥ ७८ ॥ जयातें काम
धेनु ऐसी माये ॥ तयासि अप्राप्य काहीं आहे ॥ म्हणोनि मी प्रवर्तों लाहे ॥ ग्रंथीं इये ॥ ७९ ॥ तरी
न्यून तें पुरतें ॥ आधीक तें सरतें ॥ करूनि घ्यावें हें मतें ॥ विनवीत असें ॥ ८० ॥ आतां देखि
जे अवधान ॥ तुम्हीं बोलविला मी बोलेन ॥ जैसें चेष्टे सूत्राधीन ॥ दारुयंत्र ॥ ८१ ॥ तैसा मी अ
नुग्रहीत ॥ साधूचा निरोपित ॥ ते आपुला अलंकारित ॥ भलते यापरी ॥ ८२ ॥ तवं गुरु म्हणे पातीरासी ॥
हें तुज बोलावें न लगे काहीं ॥ आतां ग्रंथा चित्त देयीं ॥ झडकरि वेगां ॥ ८३ ॥ या बोला निवृत्तिदा
स ॥ पावोनि परम उल्लास ॥ म्हणे पर्यैसा मना अवकाश ॥ देउनियां ॥ ८४ ॥ धृतराष्ट्र उवाच ॥

(१०)

॥गीता० ॥५॥ ॥अध्या० १॥१॥

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः॥ मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय॥१॥ टिका॥ तरि
पुत्रस्नेहें मोहितु॥ धृतराष्ट्र असे पुसतु॥ म्हणे सांघें संजया मातु॥ कुरुक्षेत्रीची॥७५॥
जें धर्मालय म्हणिजे॥ तेथें पांडव आणि माझे॥ गेले असती व्याजें॥ झुंझाचेनि॥७६॥ तरि
ते चियेतुला अवसरीं॥ काय कीजत असे येरयेरीं॥ हें झडकरी कथन करीं॥ मज प्रति॥७७॥
संजय उवाच॥ दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा॥ आचार्यमुपसंगम्य राजा
वचनमब्रवीत्॥२॥ टिका॥ ते वेळीं संजय बोले॥ म्हणे पांडवसैन्य उचललें॥ जैसें महा
प्रळयीं पसरलें॥ कृतांतमुख॥७८॥ तैसें तें घनदाट॥ उठावलें येकवाट॥ जैसें उसळलें का
ळकूट॥ धरी कवण॥७९॥ नातरी वडवानळु जैसा डुकौला॥ प्रळयवातें पोखला॥ सागरु शो ळ४
षूनि उधवला॥ अंबरासी॥८०॥ तैसें दळ दुर्धर॥ नानाव्यूहीं परिकर॥ अवगमलें भया
सुर॥ तिये काळीं॥८१॥ तें देखिलियां दुर्योधनें॥ अव्हेरिलें कवणे मानें॥ जैसें न गणिजे पं
चाननें॥ गजघंटांतें॥८२॥ मग द्रोणापासीं आ॥ तयातें म्हणे हा देखिला॥ कैसा दळभार उचलला॥

उ१

॥६॥

पाडवांचा ॥ ५ ॥ पश्यैतां पांडुपुत्राणामाचार्य महतीं चमुं ॥ व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शि
ष्येण धीमता ॥३॥ टिका ॥ गिरिदुर्ग जैसे चालते ॥ तैसे विविध व्यूह सभोंवतें ॥ हें रचिलें
आया बुद्धिमंते द्रुपदकुमरें ॥ ६ ॥ जो कां तुम्हीं शिष्य स्थापिला ॥ विद्या देऊनि कुरटाळे
ला ॥ तेणें हा सैन्यसिंधु पाखरिला ॥ देखदेख ॥ ७ ॥ श्लोक ॥ अत्र शूरा महेष्वासा भी
मार्जुनसमा युधि ॥ युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥४॥ टि ॥ आणीक ही अ
साधारण ॥ जे शस्त्रास्त्री प्रवीण ॥ जे क्षात्रधर्मी निपुण वीर आहाति ॥ ८ ॥ जे बळें
प्रौढि पौरुषें ॥ जैसी भीमार्जुनासारिखे ॥ तरी सांघेन कवतिकें ॥ प्रसंगेंचि ॥ ९ ॥ येथें युयुधा
न सुभट ॥ आला असे विराट ॥ महारथी श्रेष्ठ ॥ द्रुपदवीर ॥ १० ॥ धृष्टकेतुश्चेकिता
नः काशीराजश्च वीर्यवान् ॥ पुरुजित्कुंतिभोजश्च शैब्यश्च नरपुंगवः ॥५॥ टिका ॥
चेकितान धृष्टकेतु ॥ काशीश्वर वीर विक्रांतु ॥ उत्तमौजा नृपनाथु ॥ शैब्य देख ॥ ११ ॥ हा कुं

(12)

॥गीताज्ञा० ॥६॥ ॥अध्या० ॥१॥

तिम्हीजपैलपाहे ॥ऐथेंयुधामन्युआलाआहे॥ अणिउत्तमौजितादिरायहे सकळजाणपैं॥ ७० ॥

श्लोक॥ ॥युधामन्युश्चविक्रांतउत्तमौजाश्चवीर्यवान्॥ सौभद्रोद्रौपदेयाश्चसर्वएवमहारथाः॥ ६॥

टिका॥ हासुभद्राहृदयनंदन जोअपरुनवाअर्जुन ॥ तोअभिमन्युम्हणेदुर्योधन॥ देखेंद्रोणा॥ १॥

आणीकहीद्रौपदीकुमर ॥हेसकळहीमहारथीवीर॥ मितिनेणिजेपरिअपार॥ मिनलेअसति॥ २॥

॥श्लोक॥ अस्माकंतुविशिष्टायतान्निबोधद्विजोत्तम॥ नायकाममसैन्यस्यसंज्ञार्थंतान्ब्रवीमिते॥ ७॥

॥टीका॥ आतांआमुचादळींनायक ॥जेरूढवीरसैन्यक॥ तेप्रसंगेंआयिक॥ सांघिजति॥ ३॥

॥श्लोक॥ भवान्भीष्मश्चकर्णश्चकृपश्चसमितिंजयः॥ अश्वत्थामाविकर्णश्चसोमदत्तिस्तथैवच॥ ८॥

॥टीका॥ उद्देशेंयेकदोनि॥ जाणिजेतिबोलौनि॥ तुम्हीआदिकरुनि॥ मुख्यजेजे॥ ४॥ हाभीष्मगंगा

ज ॥ नंदनु॥ जोप्रतापेंतेरवीभानु॥ रिपुगजपंचानन॥ कर्णवीर॥ ५॥ येकाचेनिमनोव्यापारें॥ हेविश्व

होयसंहरे॥ हाकृपाचार्यनपुरे॥ येकलाचि॥ ६॥ येथेंविकर्णवीरआहे॥ हाअश्वत्थामापैलपाहे॥

जयाचाअडदरसदावाहे॥ कृतांतमनीं॥ ७॥ समितिंजयसोमदंति॥ ऐसेवीरबहुतआहाति॥

अयांचियाबळामिति॥ धात्रानेणे॥ ८॥ श्लोक॥ अन्येचबहवःशूरामदर्थेत्यक्तजीविताः॥ नानाश

॥६॥

राजवाडे संशोधन मंदिर धुळे

र
स्त्रशस्त्रैश्च सर्वे युद्धविशारदाः ॥ ९ ॥ हे ऐसे अस्त्रविद्यापारंगत ॥ मंत्रावतार मूर्त ॥ होका जे अस्त्रजात ॥ ये
थोनि रुद्ध ॥ ९ ॥ हे अप्रतिमल्ल जगीं ॥ पुरता प्रताप आंगीं ॥ परि सर्वप्राणें मजचि लागीं ॥ आरायिले आहाति ॥ १० ॥
पतिव्रतेचें हृदय जैसें ॥ पतिवांचूनि न स्पर्शी ॥ मी सर्वस्व ययां तैसें ॥ सुभटांसी ॥ ११ ॥ आमुचिया काजा वे ॥
नियाडें ॥ देखती आपुलें जीवित थोकडें ॥ ऐसे निरवधि चोखडे स्वामिभक्त ॥ १२ ॥ जुंझारी कुळकटि जा
णती ॥ केवें कीर्ती सीं जिती ॥ हें बहु असो शास्त्रनीति ॥ येथोनियां ॥ १३ ॥ ऐसे सर्वी परिपूर्ण विरदळी अ
सती आमुते ॥ आतां काय गणूं यातें ॥ अपार हे ॥ १४ ॥ श्लोक ॥ अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितं ॥
पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितं ॥ १० ॥ वीर क्षत्रियांमाजि श्रेष्ठ ॥ जो जगज्जेठी जगीं सुभट ॥ तया
दळवैपण अप्पाट ॥ भीष्मासि पें ॥ १५ ॥ आतां ययाचें निवळें गवसलें ॥ हें दुर्ग जैसें पंनाशिलें ॥ येणेंमा
ने थोकुलें ॥ लोकत्रय हें ॥ १६ ॥ आधींचि समुद्र पाहीं ॥ तेथें दुवाडपण कवणा नाहीं ॥ मग वडवानळ तैस
या हीं विरजा जैसा ॥ १७ ॥ नां तरि प्रळयवन्हि महावात ॥ ययां दोहीं जैसा सांघात ॥ तैसा हा गंगासुत ॥
सेनापति ॥ १८ ॥ आतां येणेंसीं कवण भिडे ॥ हें पांडवसैन्य कीर थोकडें ॥ या परी सैन्य अपाडें ॥ दिसत असे ॥ १९ ॥
वरि भीमसेन बेंथ ॥ तो जाला असे सेनानाथ ॥ ऐसें बोलोनि सुमानाथ हे मात ॥ सोडिली तेणें ॥ २० ॥

॥गीताज्ञा॰ श्लो॰॥ अयनेषुचसर्वेषुयथाभागमवस्थिताः॥ भीष्ममेवाभिरक्षंतुभवंतःसर्वएवहि॥११॥ टि॰॥ ॥अध्या
॥७॥ मगपुनरपिकायबोले॥ सकळांसैन्यकांतेंम्हणितलें॥ आतांदळभारआपुलाले॥ सरसेकरा॥२१॥ ॥१॥
जयांजियांअक्षौहिणी॥ तेणेंतियाआरणी॥ वरिगणनाकवणींकवणी॥ महारथीयां॥२२॥ तेथणेंतेआ
वरिजे॥ भीष्मातळींराहिजे॥ म्हणेद्रोणातेंपाहिजे॥ तुम्हीसकळ॥२३॥ हाचियेकराखावा॥ मींतैसादेखा
वा॥ येणेंदळभारआघवा॥ साचअमुवा॥२४॥ श्लो॰॥ तस्यसंजनयन्हर्षंकुरुवृद्धःपितामहः॥ सींह
नादंविनद्योच्चैःशंखंदध्मौप्रतापवान्॥१२॥ टि॰॥ यांराजयाचियाबोला॥ सेनापतिसंतोषला॥
मगतेणेंकेला॥ सींहनाद॥२५॥ तोगाजतसेअद्भुत॥ दोहींसैन्याआंत॥ प्रतिध्वनीनसमात॥ उपज
तसे॥२६॥ तयाचितुळणेसवें॥ वीरवृत्तीचेनिथावें॥ दिव्यशंखभीष्मदेवें॥ आस्फुरिला॥२७॥ तेदो
न्हींनादमिनले॥ तेथेंत्रैलोक्यबधिरजालें॥ जैसेंआकाशकोंपडिलें॥ तुटोनियां॥२८॥ घडघ
डितअंबर॥ उचंबळतसागर॥ क्षोभलेंचराचर॥ कांपतसे॥२९॥ तेणेंमहाघोषगजरें॥ दुमदुमिताति
गिरिकंदरें॥ तंवदळांमाजिरणतुरें॥ आस्फुरिलीं॥३०॥ श्लो॰॥ ततःशंखाश्चभेर्यश्चपणवानकगो
मुखाः॥ सहसैवाभ्यहन्यंतसशब्दस्तुमुलोऽभवत्॥१३॥ टि॰॥ उदंडसैंघबाजतें॥ भयानकेंखाखातें॥

वा१



"Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

महाप्रळयजेथें । थाकडांसि ॥ ३१ ॥ भेरी निशाण मांदळ । शंखटमकिका हाळाभोगळ । आणि भया
सुररणकोल्हाळ सुभटांचे ॥ ३२ ॥ आवेशें भुजा त्राहाटिती । विशाळ वीर हाकादेती । जेथें महामद
मदजाती । आवारिती ना ॥ ३३ ॥ येकां उभयाचि प्राण गेले । चांगांचे दांत बैसले । बिरिदांचे दाटुले हिंवं
ताती ॥ ३४ ॥ तेथें भेडांची कवणमात । काचयाकरां फटत । जेणें दचकला हृतांत । आंग नेघे ॥ ३५ ॥
ऐसा अद्भुत तुरबंबाळ । ऐकोनि ब्रह्मयाच्या कुळां । देव म्हणती प्रळयकाळ । वोडवला आजि ॥ ३६ ॥ ऐसी
स्वर्गी जीमात । ऐकोनितां आकांत । तवं पांडवदळांआंत । वर्तलें कायी ॥ ३७ ॥ श्लोक ॥ ततः श्वेतैर्हयैर्युक्ते
महति स्यंदने स्थितौ ॥ माधवः पांडवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ॥ १४ ॥ टिका ॥ होकां निजसार विज
याचें । कितें भांडार महातेजाचें । जेथें गरुडाचिये जावळिचें । कातले च्याकी ॥ ३८ ॥ किं पाखांचा मे
रु जैसा । माहां वरु मिरवतसे तैसा । तेजें कोंदाटलिया दिशा । जयाचेनि ॥ ३९ ॥ जेथें अश्ववाहकु आ
पण । वैकुंठिचा राणा जाण । तयाचिया रथाचे गुण । काय वर्णु ॥ ४० ॥ ध्वजस्तंभावरि वानर । तो मूर्ति
मंत शंकर । तिये रथीं सारथी सारंगधर । अर्जुनेंसीं ॥ ४१ ॥ देखा नवल तया प्रभूचें । अद्भुत प्रेम भ
क्तांचें । जें सारथ्य पार्थाचें करित असे ॥ ४२ ॥ पायीक पाठिसीं घातला । आपण पुढारां राहिला ॥

॥गीताटीका॥ ॥८॥ तेणें पांचजन्य स्फुरिला । अवलिळाची ॥ ४३ ॥ श्लोक ॥ पांचजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः ॥ पौंड्रं द ॥अध्याय॥
ध्मौ महाशंखं भीमकर्मा वृकोदरः ॥ १५ ॥ टिका ॥ परि तो महाघोष थोर । गाजत असे गहिंवर । जैसा ॥१॥
उदे जालो पी दिनकर नक्षत्रां तें ॥ ४४ ॥ तैसे तुरबंबाळ भरवंते । जे कौरवदळीं गाजत होते । ते हारपोनि
नेणों कउते । गेले तेथें ॥ ४५ ॥ तैसाचि देखें येरें । निनादें अति गजरें । देवदत्त धनुर्धरें । आस्फुरिला ॥ ४६ ॥
ते पत्न्हीं शब्द अचाट । मीनले येकवाट । तेथें ब्रह्मकटाह शतकूट । होंपाहातसे ॥ ४७ ॥ तवं भीमसेन
विसाणैला । जैसा महाकाळ रवव कला । तेणें पौंड्र आस्फुरिला । महाशंख ॥ ४८ ॥ श्लोक ॥ अनंतवि
जयं राजा कुंतीपुत्रो युधिष्ठिरः । नकुळः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥ १६ ॥ टिका ॥ तो महाप्रळ
य जळधर । तैसा घडघडिला गहिंवर । तवं अनंतविजय युधिष्ठिर । आस्फुरित असे ॥ ४९ ॥ नकु
ळें सुघोष । सहदेवें मणिपुष्पक । जेणें नांदें अंतक । गजबजिला ठाके ॥ ५० ॥ श्लोक ॥ काश्यश्च पर
मेष्वासः शिखंडी च महारथः । धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥ १७ ॥ श्लोक ॥ द्रुपदो द्रौप
देयाश्च सर्वशः पृथिवीपते । सौभद्रश्च महाबाहुः शंखान्दध्मुः पृथक्पृथक् ॥ १८ ॥ टिका ॥ तेथें अर्जु
नाचा सुत । सात्यकी अपराजित । धृष्टद्युम्न पनाथ । शिखंडिया ॥ ५१ ॥ वैराटादि नृपवर । जेसै ॥८॥

(17)

न्यकुळगुरु वीर ॥ तिहीं नानाशंख निरंतर आस्फुरिले ॥ ५२ ॥ तेथें भूपति होते आणिक ॥ द्रुपद
द्रौपदादिक ॥ हा काशीपति देख ॥ महाबाहु ॥ ५३ ॥ श्लो० ॥ स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदार
यत् ॥ नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥ १९ ॥ टी० ॥ तेणें महाघोष निर्घातें ॥ शेष कूर्म अव
घडले ॥ गजबळें निर्भारातें ॥ सांडूं पाहाती ॥ ५४ ॥ तेथें तिन्ही लोक डंडळित ॥ मेरु मांदार आंदो
ळत ॥ समुद्र जळ उसळत ॥ कैलासवेरीं ॥ ५५ ॥ पृथ्वीतळ उलथों पाहात ॥ आकाश असे आ
सुडत ॥ नक्षत्रांचा सडा होत ॥ बहु तेथें ॥ ५६ ॥ सृष्टि गेली रे गेली ॥ देवां मोकळवाट जाली ॥
ऐशीं यकि टाळी पिटिली ॥ सत्यलोकीं ॥ ५७ ॥ दिहाचि दिन थोकला ॥ जैसा प्रळयकाळ मांडला ॥
तेथें हाहाकार उठिला ॥ तिहीं लोकीं ॥ ५८ ॥ तवं आदिपुरुष विस्मित ॥ म्हणे झणें होय अंत ॥ मग
लोपिला अद्भुत ॥ संभ्रम तो ॥ ५९ ॥ म्हणोनि विश्व सावरिलें ॥ येरवीं युगांत होतें वोडवलें ॥ जेध
वां महाशंख आस्फुरिले ॥ कृष्णादिकीं ॥ ६० ॥ तो घोष तरि उपसंहरला ॥ परि पडिसादा हो
ता उरला ॥ तेणें दळभार विध्वंसिला ॥ कौरवांचा ॥ ६१ ॥ जैसा सींह गजघटा ॥ आंत संचरे
लीला विदारित ॥ तैसा हृदयांतें असे भेदित ॥ कौरवांचिया ॥ ६२ ॥ तो गजरु जवं ऐकती ॥

(18)

॥गीता०॥ ॥१॥ ॥अध्या०॥ ॥१॥

तवं उभया चिर्‍हिंये घालिती॥ येकमेकां तें म्हणती॥ सावधरे सावध॥ ६३॥ तेथें बळें प्रौढिपु
रते॥ जे महांरथी वीर होते॥ तिहीं पुनरपी दळातें॥ सांवरिलें॥ ६४॥ श्लोक॥ अथ व्यवस्थितां
दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः॥ प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडवः॥ २०॥ टीका॥ मग स
रिसे पखे उठावले॥ दुणवटौनि चालिले॥ तयादंडिं क्षोभले॥ लोकत्रय॥ ६५॥ तेथें बाण
वरि धनुर्धर॥ वर्षताति निरंतर॥ जैसे प्रळयांत जळधर॥ अनिवार कां॥ ६६॥ तें देखि
लियां अर्जुनें॥ संतोष घेउनियां मनें॥ मग सत्रमोंदिठि सैन्य॥ चालित असे॥ ६७॥ तवं
संग्रामीं सज्ज जाहाले॥ सकळ कोरव देखिले॥ मग लीला धनुष्य उचलिलें॥ पांडुकुम
रें॥ ६८॥ श्लोक॥ अर्जुन उवाच॥ हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते॥ सेनयोरुभयो
र्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत॥ २१॥ टीका॥ तवं कीं म्हणतसे देवा॥ आतां झडकरि रथ पेलावा॥
नेउनि मध्यें घालावा॥ दोहीं दळां॥ ६९॥ श्लोक॥ यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थिता
न्॥ कैर्मया सह योद्धव्यमस्मिन्रणसमुद्यमे॥ २२॥ टीका॥ जवं मी नावेक॥ हे सकळही वी
र सैनिक॥ न्याहाळीन अशेष॥ झुंझते जे॥ ७०॥ श्लोक॥ योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः॥

यु

२२

Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai - Joint project of the

धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥२३॥ टीका ॥ येथें आले असती अघवे ॥ परि त्यां
कवणेंसीं झुंझावें ॥ हे रणीं लागती पाहावें ॥ म्हणोनियां ॥७१॥ बहुतक रूनि कौरव ॥ हे बाहुदुष्ट
स्वभाव ॥ वांढिवेवीण हाव ॥ बांधती झुंझीं ॥७२॥ झुंझाची आवडि धरिती ॥ परि संग्रामीं धीर नक
ती ॥ हें सांघों निरायाप्रति ॥ काय संजय म्हणे ॥७३॥ संजय उवाच ॥ श्लोक ॥ एवमुक्तो हृषीके
शो गुडाकेशेन भारत ॥ सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमं ॥२४॥ टीका ॥ ऐका अर्जुनें
तुकें बोलिला ॥ तवं कृष्णें रथ पेलिला ॥ दोहीं सैन्यांमाजि केला ॥ उभा तेणें ॥७४॥ श्लोक ॥ भीष्म द्रो
णप्रमुखतः सर्वेषां च महीक्षितां ॥ उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति ॥२५॥ टीका ॥
जेथें भीष्म द्रोणादिक ॥ जवळिके चि सन्मुख ॥ पृथिवीपति आणीक ॥ बहुत आहाती ॥७५॥ श्लोक ॥
तत्रापश्यत्स्थितान्पार्थः पितॄनथ पितामहान् ॥ आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्स
खींस्तथा ॥२६॥ श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि ॥ तान्समीक्ष्य स कौंतेयः सर्वान्बंध
नवस्थितान् ॥२७॥ टीका ॥ तेथें स्थिर करूनि रथ ॥ अर्जुन असे पाहात ॥ तो दळभार समस्त ॥
संभ्रमेंसीं ॥७६॥ मग म्हणे देवा देख देख ॥ हे गोत्रगुरु अशेष ॥ तवं कृष्णा मनीं नावेक ॥ विस्मय

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com